**जनसंपर्क अधिकारी**

**पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार**

**पोलीस आयुक्त यांचे कार्यालय**

रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे फोन नं ०२२- २९४५१००१

Email ID – pro.cp.mb-v@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्र. ३८-२२** **दिनांक ०४/०२/२०२२**

# एटीएम सेन्टर मधुन पैसे काढुन देण्याचा बहाणा करुन हातचालाखीने एटीएमची अदलाबदली करुन फसवणुक करणाऱ्या आरोपीतांना अटक.

मिरा-भाईदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय परिसरात गेल्या काही महिण्यांपासुन एटीएम सेंन्टर मधुन पैसे काढुन देण्यासाठी मदतीचा बहाणा करुन हातचालाखीने एटीएम कार्डाची अदलाबदली करुन फसवणुक करणारी टोळी सक्रीय झाली होती. सदर घटनांची वरिष्ठ पोलीस अधिका-यांनी गांभिर्याने दखल घेवुन आरोपीतांचा शोध घेवुन पायबंद करणे बाबत सुचना दिल्या होत्या.

त्याअनुषंगाने पोलीस उप आयुक्त (गुन्हे), सहाय्यक पोलीस आयुक्त, (गुन्हे) यांनी दिलेल्या सुचना व मार्गदर्शनाप्रमाणे गुन्हे शाखा कक्ष-३ विरारचे पोलीस पथक असे विविध गुन्हयाचे सि.सि.टि.व्ही. फुटेज व गुप्त बातमीदार यांचेकडून मिळालेल्या माहितीवरुन आरोपीत नामे- १) इरफान अब्बास अन्सारी वय २७ वर्षे, रा. मौर्या चाळ, धानिव बाग तलावा जवळ, नालासोपारा पुर्व, ता. वसई, जि. पालघर. २) सुभाष अभिराम यादव वय २५ वर्षे, रा. मौर्या चाळ, धानिव बाग तलावा जवळ, नालासोपारा पुर्व, ता. वसई, जि. पालघर. ३) अलि अहमद सलाम इद्रिसी अन्सारी वय ४० वर्षे, रा. मौजे करवली गाव, ता. भिवंडी, जि. ठाणे. ४) कमलेश भगवती सिंग वय ५० वर्षे, रा. सी/१४०७, नक्षत्र बिल्डींग, नायगाव पुर्व, ता. वसई, जि. पालघर यांना ताब्यात घेवुन त्याचेकडे चौकशी करता त्यांचे कब्जात विविध बॅकेची ५४ ए.टी.एम. कार्ड मिळुन आले तसेच सदर गुन्हा करण्यासाठी वापरण्यात येणारी ऑटोरिक्षा व १,२१,५००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आलेला आहे.

नमुद आरोपीत यांचे कब्जात मिळुन आलेल्या ए.टी.एम कार्डाची पडताळणी केली असता नमुद आरोपीत यांचा खालील गुन्हयात सहभाग निष्पन्न झाला आहे.

| अ.क्र | पोलीस ठाणे | गुन्हा रजि नंबर | कलम |
|---|---|---|---|
| १ | वालीव पोलीस ठाणे | ११०/२०२२ | भा.द.वी. कलम ४२० |
| २ | पेल्हार पोलीस ठाणे | ९०/२०२२ | भा.द.वी. कलम ४२०, ३४ |
| ३ | पेल्हार पोलीस ठाणे | ९६/२०२२ | भा.द.वी. कलम ४२०, ३४ |
| ४ | तुळींज पोलीस ठाणे | ८३/२०२२ | भा.द.वी. कलम ४२० |

नमुद आरोपीत यांचेकडे अधिक तपास करता आरोपीत यांनी मिरा-भाईदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय, ठाणे शहर व मुंबई शहर हद्दीत अशाच प्रकारे अनेक गुन्हे केले असल्याची माहीती दिली आहे.

नमुद आरोपीत हे पुढील कारवाई करीता वालीव पोलीस ठाणे गुन्हा रजि नंबर ११०/२०२२ भा.द.वी. कलम ४२०, ३४ या गुन्हयात वालीव पोलीस ठाणे येथे वर्ग करण्यात आलेले असुन त्यांचे कब्जात मिळुन आलेल्या विविध बॅकेचे ए.टी.एम. कार्ड बाबत अधिक तपास सुरु आहे.

वरील कामगिरी डॉ. श्री. महेश पाटील, पोलीस उप आयुक्त, (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहा. पोलीस आयुक्त, (गुन्हे), मि.भा.वि.व पोलीस आयुक्तालय यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि/ प्रमोद बडाख, पोउपनिरी/ शिवाजी खाडे, उमेश भागवत, पो.हवा/ अशोक पाटील, पो.ना/ मनोज चव्हाण, मुकेश तटकरे, सागर बारवकर, मनोज सकपाळ, शंकर शिंदे, सचिन घेरे, पो.अं./ राकेश पवार, अश्विन पाटील, सर्व नेम- गुन्हे शाखा, कक्ष -३ यांनी उकृष्टरित्या पार पाडली आहे.